सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/विभागीय परीक्षेच्या संधीची गणना करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २३१७/प्र.क्र.३३/का.१७**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १७ नोव्हेंबर, २०१७.

संदर्भ-

१) महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा (निम्नस्तर लिपिक) सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियम, १९७७,
२) महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा (सहायक) सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियम, १९७७,
३) महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा (कक्ष अधिकारी) विभागीय परीक्षा नियम, १९७७.

**शासन परिपत्रक-**

मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील लिपिक-टंकलेखक, सहायक कक्ष अधिकारी यांची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा व सहायक कक्ष अधिकाऱ्यांची कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठीची विभागीय परीक्षा संदर्भिय नमूद परीक्षा नियमातील तरतुदीनुसार आयोजित करण्यात येते.

२. या परीक्षा नियमांनुसार खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे तीन संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | परीक्षा उत्तीर्ण बाबतचे निकष |
|---|---|---|
| १ | लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा | नियुक्तीच्या दिनांकापासून चार वर्षात तीन संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |
| २ | सहायक कक्ष अधिकारी यांची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा | |
| ३ | सहायक कक्ष अधिकाऱ्यांची कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठीची विभागीय परीक्षा | नियुक्तीच्या दिनांकापासून ५ वर्षाची अखंड सेवा पूर्ण झाल्यानंतर, नियुक्तीच्या दिनांकापासून ९ वर्षाच्या अखंड सेवेमध्ये आणि तीन संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |

उपरोक्त नमूद परीक्षांमधील संधीची गणना कशाप्रकारे करण्यात येते याबाबत या विभागाकडे बऱ्याचदा विचारणा होत असल्याने त्याअनुषंगाने असे स्पष्ट करण्यात येते की, **या विभागामार्फत दरवर्षी आयोजित करण्यात येणारी परीक्षा ही या परीक्षेला बसण्यासाठी पात्र उमेदवारांना देण्यात आलेली संधी असते.** विभागामार्फत आयोजित होणारी परीक्षा हीच संधी म्हणून गणण्यात येत असल्याने **परीक्षेस उत्तीर्ण होण्यासाठी तीन संधी देतांना चार वर्षाचा कालावधी देण्यामागील प्रयोजन काय** याबाबत तपशिलवार व सोदाहरण स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

**उदा.** सहायक कक्ष अधिकाऱ्यांची कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठीची विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवारास नियुक्तीच्या दिनांकापासून ५ वर्षाची अखंड सेवा पूर्ण झाल्यानंतर,

नियुक्तीच्या दिनांकापासून ९ वर्षाच्या अखंड सेवेमध्ये तीन संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. प्रतीवर्षी सदर परीक्षेचे आयोजन नोव्हेंबर-डिसेबर महिन्यात करण्यात येत असल्याने परीक्षेस पात्र ठरण्यासाठी **३१ ऑक्टोबर** रोजी ५ वर्षाची अखंड सेवा पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे.

परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठीचे निकष व परीक्षा आयोजनाचे वेळापत्रक पाहता, उमेदवारांच्या नियुक्तीच्या वेगवेगळया दिनांकांमुळे उमेदवार परीक्षेस बसण्यासाठी पात्र ठरण्याच्या वेगवेगळया संधी उपलब्ध होतात हे पुढील तक्त्याव्दारे स्पष्ट करण्यात येत आहे:-

| बाब | उमेदवार "अ" | उमेदवार "ब" |
|---|---|---|
| नियुक्तीचा दिनांक | १० जानेवारी, २०१० | ४ नोव्हेंबर, २०१० |
| सेवेची ५ वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक | ९ जानेवारी, २०१५ | ३ नोव्हेंबर, २०१५ |
| प्रथम संधी (नोव्हें/डिसें. २०१५) | ३१ ऑक्टोबर पर्यंत ५ वर्ष अखंड सेवा पूर्ण झाल्यामुळे परीक्षेचा अर्ज भरण्यास व परीक्षेस बसण्यास **पात्र** | ३१ ऑक्टोबर रोजी ५ वर्ष अखंड सेवा पूर्ण न झाल्यामुळे परीक्षेचा अर्ज भरण्यास **अपात्र** |
| व्दितीय संधी (नोव्हें/डिसें. २०१६) | परीक्षेला बसण्यास **पात्र** | परीक्षेला बसण्यास **पात्र** |
| तृतीय संधी (नोव्हें/डिसें. २०१७) | परीक्षेला बसण्यास **पात्र** | परीक्षेला बसण्यास **पात्र** |
| चतुर्थ संधी (नोव्हें/डिसें. २०१८) | परीक्षेला बसण्यास **पात्र** | परीक्षेला बसण्यास **पात्र** |
| सेवेची ९ वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक | ९ जानेवारी, २०१९<br>(नियुक्तीच्या दिनांकापासून ९ वर्षांची अखंड सेवा पूर्ण होत असल्याने नोव्हें/डिसें. २०१९ ची परीक्षा ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवारास विहीत केलेल्या कालावधीनंतर होणारी परीक्षा असेल) | ३ नोव्हेंबर, २०१९<br>(परीक्षेचा अर्ज भरण्यास पात्र, मात्र नोव्हें/डिसेंबर २०१९ मधील परीक्षा आयोजनाच्या कार्यवाहीपूर्वी ९ वर्षांची अखंड सेवा पूर्ण होत असल्याने , नोव्हें/डिसें. २०१९ ची परीक्षा ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवारास विहीत केलेल्या कालावधीनंतर होणारी परीक्षा असेल) |

३. उपरोक्त सोदाहरण स्पष्टीकरणाचे अवलोकन करता असे दिसून येते की, विभागीय परीक्षा नियमातील तरतुदीनुसार नियुक्तीची तारीख विभिन्न असल्यामुळे चार वर्षांमध्ये परीक्षेला बसण्यास उमेदवार "अ" यास चार संधी तर उमेदवार "ब" यास केवळ तीनच संधी प्राप्त होतात. त्यामुळे ज्या उमेदवारांना परीक्षेला बसण्याच्या केवळ तीन संधी प्राप्त होतात त्या उमेदवारांवर अन्याय होवू नये व सर्व उमेदवारांना समान संधी प्राप्त व्हाव्यात या उद्देशाने परीक्षा आयोजन हीच संधी म्हणून गणण्यात आली असून चार वर्षात तीन संधीची तरतूद परीक्षा नियमावलीत करण्यात आली आहे. सदर तरतुदीमुळे उमेदवार "अ" हा परीक्षेस बसण्यासाठी चार वेळा पात्र ठरत असला तरी परीक्षा आयोजन हीच संधी असल्यामुळे सदर उमेदवारास पहिल्या तीन संधीत म्हणजेच नोव्हें/डिसें २०१५ ते नोव्हें/डिसें २०१७ या पहिल्या तीन वर्षातच परीक्षा उत्तीर्ण होणे क्रमप्राप्त आहे. तसेच उमेदवार "ब"

हा परीक्षेस बसण्यास केवळ तीन वेळा पात्र ठरत असून परीक्षा आयोजन हीच संधी असल्यामुळे सदर उमेदवारास देखील तीन संधी (नोव्हें/डिसे. २०१६ ते नोव्हें/डिसें २०१८) उपलब्ध होतात. सबब दोन्ही उमेदवारास चार वर्षात तीनच संधी उपलब्ध होतात अशा प्रकारे सर्वांना समान संधी उपलब्ध करुन देण्यात येतात.

४. सहायक कक्ष अधिकारी व लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षेसाठीही वेगवेगळ्या कालावधीत नियुक्त उमेदवारांना मिळणाऱ्या संधीतही उपरोक्त प्रमाणे तफावत आढळून येते. त्यामुळे सदर परीक्षेसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांना मिळणाऱ्या संधीची गणना ही वरीलप्रमाणेच करण्यात येते.

५. उपरोक्त स्पष्टीकरण लक्षात घेता, **परीक्षेला बसण्यास पात्र असूनही जर एखाद्या वर्षी उमेदवाराने परीक्षेचा अर्ज सादर केला नाही किंवा परीक्षेचा अर्ज सादर करुन परीक्षेस अनुपस्थित राहीला तरी त्या वर्षी आयोजित होणारी परीक्षा ही तीन संधीमधील एक संधी म्हणून गणण्यात येते.**

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१११७१५१२११७१०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Pandurang Wagh

Digitally signed by Rajendra Pandurang Wagh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9e4468a63fe9f9f2a565a0790f46e3c14a3715b2370430433845720a9c4c8107, serialNumber=7adb1868a49b8719e27d3453044671a8ceddbd04af26dd2089ed03e6b1bd92bd, cn=Rajendra Pandurang Wagh
Date: 2017.11.17 15:15:16 +05'30'

**(राजेंद्र वाघ)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१.मा. राज्यपाल यांचे सचिव,

२.मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

३.सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

४.मा.मुख्य सचिव यांचे कार्यालय

५.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई,

६. आस्थापना अधिकारी, सर्व मंत्रालयीन विभाग यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक त्यांच्या विभागातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

७.सामान्य प्रशासन विभाग,का.क्र.१४-अ,१४-ब,मंत्रालय, मुंबई.

८.निवडनस्ती(कार्यासन-१७).